मराठी माणसाचा मानदंड
# राजदंड
follow us : /rajdandlive
www.rajdand.com
। पश्चिम महाराष्ट्र ।

RNI Regd No.72105/99 * वर्ष २५ * अंक २९६ सातारा शनिवार दि १३ जुलै २०२४ * पाने ८ * किंमत ५ रू/

# विधान परिषद निवडणुकीत महायुतीची बाजी!

## महायुतीचे सर्वच्या सर्व ९ जण विजयी, मविआतील शेकापचे जयंत पाटील पराभूत

**मुंबई :** विधान परिषदेच्य ानिवडणुकीतमहायुतीने मतांचे गणित जुळवून आणत बाजी मारली. विधान परिषदेच्या११ रिक्त जागांसाठी १२ उमेदवार रिंगणात होते. महायुतीने ९ तर महाविकास आघाडीने ३ उमेदवार दिले होते. गुप्त पद्धतीने मतदान झाले आणि निकाल लागला. यात भाजपाचे पंकजा मुंडे, योगेश टिळेकर, अमित गोरखे, परिणय फुके आणि पुरस्कृत सदाभाऊ खोत तर महायुतीतील शिवसेनेच्या भावना गवळी व कृपाल तुमाणे आणिराष्ट्रवादी काँग्रेसचे शिवाजीराव गर्जे आणि राजेश विटेकर असे सर्व ९ उमेदवार विजयी झाले. महाविकास आघाडीतील काँग्रेसच्या प्रज्ञा सातव आणि ठाकरेंच्या शिवसेनेचे मिलिंद नार्वेकर विजयी झाले. तर शरद पवारांच्या राष्ट्रवादी पुरस्कृत शेकाप नेते जयंत पाटील यांचा पराभव झाला.

**विधान परिषदेच्या ११ विजयी उमेदवारांना किती मते मिळाली?**

योगेश टिळेकर (भाजपा) - २६ पंकजा मुंडे (भाजपा) - २६ परिणय फुके (भाजपा) - २६ अमित गोरखे (भाजपा)- २६ सदाभाऊ खोत (भाजपा)- २६भावना गवळी (शिंदे गट)- २४ कृपाल तुमाने (शिंदे गट)- २५ राजेश विटेकर (दादा गट)- २३शिवाजीराव गर्जे (दादा गट)- २४ प्रज्ञा सातव (काँग्रेस)- २५मिलिंद नार्वेकर (ठाकरे गट)- २४

पराभूत उमेदवार जयंत पाटील (शेकाप- शरद पवार गट पुरस्कृत)- याचाच अर्थ उर्वरित दोन अधिकची मते ही भाजपाला काँग्रेसकडून मिळाल्याचा अंदाज आहे.एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडे अपक्ष आमदारांच्या पाठिंब्यासह पहिल्या पसंतीची ४६ मते होती. शिंदेंच्या शिवसेनेला ४९ मते मिळाली. म्हणजेच त्यांनाही समाजवादी पार्टी आणि चखच् ची मते मिळाल्याची शक्यता आहे.

**काँग्रेसची फुटलेली ७ मते कुठे गेली?**

**काँग्रेसची ७ मते फुटल्याचा संशय सध्या तरी बांधला जातोय. काँग्रेसकडे एकूण ३७ मते होती. काँग्रेसच्या उमेदवार प्रज्ञा सातव यांना पहिल्या पसंतीची २५ मते मिळाली.सातवांना २५ मते दिल्यानंतर काँग्रेसकडे १२ मते शिल्लक राहिली. उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेकडे १७ मते होती, त्यामुळे मिलिंद नार्वे कर यांना काँग्रेसच्या ६ मतांची गरज होती. नार्वेकरांना उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेचे १७ आणि काँग्रेसची ५ अशी पहिल्या पसंतीची फक्त २२ मते मिळाली. म्हणजेच काँग्रेसची १२ पैकी ७ मते फुटली.अजित पवारांच्याराष्ट्रवादी काँग्रेसकडे४२ मते होती पण त्यांच्या दोनही उमेदवारांना मिळून ५ मते जास्त मिळाली. म्हणजेच काँग्रेसच्या ७ पैकी ५ मते अजितदादांच्या राष्ट्रवादीने फोडली असा अंदाज आहे. भाजपाकडे ११५ मते होती आणि भाजपाच्या उमेदवारांना पहिल्या पसंतीची एकूण ११८ मते मिळाली.भाजपाला एकूण ३ मते जास्त मिळाली. त्यापैकी एक मत हे मनसेचे असू शकते.**



**महत्त्वाचे**

### जातिपातीच्या राजकारणावरून नितीन गडकरी संतप्त



**मुंबई : :** जातिपातीचं राजकारणं हे भारताच्या राजकीय क्षेत्रातील कटू वास्तव आहे. अनेक बडे नेते आणि सर्वच राजकीय पक्ष निवडणुका जिंकण्यासाठी कुठे ना कुठे जातिपातीच्या राजकारणाचा आधार घेत असतात. दरम्यान, भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी जातीपाच्या राजकारणावर जोरदार टीका केली आहे.

जातिपातीचं राजकारणं हे भारताच्या राजकीय क्षेत्रातील कटू वास्तव आहे. अनेक बडे नेते आणि सर्वच राजकीय पक्ष निवडणुका जिंकण्यासाठी कुठे ना कुठे जातिपातीच्या राजकारणाचा आधार घेत असतात. दरम्यान, भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी जातीपातीच्या राजकारणावर जोरदार टीका केली आहे.

एका कार्यक्रमामध्ये उपस्थितांना संबोधित करताना नितीन गडकरी म्हणाले की, महाराष्ट्रामध्ये सध्या जातिपातीचं राजकारण होत आहे. मी जात-पात मानत नाही. जो जातिपातीची बात करेल, त्याच्यावर मी सणसणीत लाथ मारेन, असा इशाराच नितीन गडकरी यांनी दिला.

गडकरी पुढे म्हणाले की, माझ्या मतदारसंघात ४० टक्के मुसलमान आहेत. मी त्यांना आधीच सांगितलं की, मी आरएसएसचा माणूस आहे. मी हाफ चड्डीवाला आहे. कुणालाही मत देण्यापूर्वी नंतर आपल्याला पुढे पश्चाताप होणार नाही याचा विचार केला पाहिजे. जो मला मतदान करेल त्याचं मी काम करणार आणि जो मत देणार नाही त्याचंही काम करणार, असे गडकरी यांनी सांगितले. दरम्यान, सध्या महाराष्ट्रामध्ये आरक्षणाच्या मुद्द्यावरून जातीपातीचं राजकारण कमालीच तीव्र झालेलं

## २५ जून 'संविधान हत्या दिवस' म्हणून पाळला जाणार

**केंद्र सरकारचा मोठा निर्णय**

संविधानाच्या मुद्द्यावरून काँग्रेसला धक्का देण्यासाठी केंद्र सरकारने मोठी खेळी केली असून, आणीबाणीची घोषणा झालेला २५ जून हा संविधान हत्या दिवस म्हणून पाळण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. २५ जून 'संविधान हत्या दिवस' म्हणून पाळला जाणार, केंद्र सरकारचा मोठा निर्णय यावर्षी झालेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये संविधान हा प्रचाराचा मोठा मुद्दा बनला होता. तसेच ४०० जागा आल्यास मोदी आणिभाजपासंविधान बदलतील, या विरोधकांनी केलेल्या प्रचारामुळेभाजपाचंमोठ्या प्रमाणात नुकसान झालं होतं. तसेच सरकार स्थापन झाल्यानंतर झालेल्या पहिल्याच अधिवेशनामध्ये विरोधी पक्षांच्या खासदारांनी हातात संविधानाच्या प्रती घेऊन शपथ घेतली होती. त्यानंतर विरोधकांना प्रत्युत्तर म्हणून सरकारने आणीबाणीचा निषेध करणारा प्रस्ताव लोकसभेत आणला होता. आता संविधानाच्या मुद्द्यावरून काँग्रेसल ाधक्का देण्यासाठीकेंद्र सरकारनेमोठी खेळी केली असून, आणीबाणीची घोषणा झालेला २५ जून हा संविधान हत्या दिवस म्हणून पाळण्याचा निर्णयकेंद्र सरकारने घेतला आहे.-

## राहुल गांधी होणार शेतकरी आंदोलनाचा चेहरा

### हमीभाव कायद्यासाठी लोकसभेत खासगी विधेयक मांडणार?

**हरियाणा :** गेल्या फेब्रुवारी महिन्यापासून पंजाब आणि हरियाणातील शेतकऱ्यांनी दिल्लीच्या सीमेवर शेतकरी आंदोलनाची धार लावून धरली आहे. शेतकरी आंदोलनासंदर्भात ९ जुलै २०२४ रोजी पंजाब-हरियाणा उच्च न्यायालयाने हरियाणा सरकारला राजधानी दिल्लीकडे जाणाऱ्या रस्त्यावरील बॅरिकेडस हटवण्याचे आदेश दिले आहेत. ज्यामुळे आंदोलक शेतकऱ्यांना दिल्लीकडे कूच करणे सोपे होणार आहे.

सर्व पक्षांना पाठवणार मागणीपत्र

अशातच आता शेतकरी आंदोलनातील प्रमुख शेतकरी संघटना असलेल्या संयुक्त किसान मोर्चाने आपल्या आंदोलनाच्या रुपरेषेत काहीसा बदल करण्याचे निश्चित केले आहे. त्यानुसार आता विशेष अभियान राबविले जाणार असून, १६ ते १८ जुलैपर्यंत सत्ताधारी पक्षासह विरोधी पक्ष आणि सर्वच पक्षांना हमीभाव कायद्यासंदर्भातील मागणीपत्र सोपवले जाणार आहे. अशातच आता या सर्वांमध्ये लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना शेतकरी आंदोलनाचा चेहरा बनवण्याची तयारी सुरु असल्याचे सांगितले जात आहे.

लोकसभेत हमीभाव कायद्यासाठी खासगी विधेयक



विशेष म्हणजे ही संपूर्ण तयारी संयुक्त किसान मोर्चाकडून हमीभाव कायदा करण्यासाठी लोकसभेत खासगी विधेयक सादर करण्यासाठी सुरु आहे. अर्थात शेतकरी आंदोलक संघटना यासाठी विरोधी पक्षांना याबाबत राजी करण्यासाठी हे मागणीपत्र सादर करणार आहे. त्याचवेळी सरकारला देखील हे मागणीपत्र दिले जाणार आहे. संयुक्त किसान मोर्चा या शेतकरी संघटनेच्या एका नेत्याने याबाबत बोलताना म्हटले आहे की, महाराष्ट्रातील शेतकरी नेते माजी खासदार राजू शेट्टी यांनी यापूर्वी लोकसभेत सादर केलेले हमीभाव कायद्याचे खासगी विधेयक पुन्हा राहुल गांधी यांनी मांडण्यास संघटनेच्या वतीने सांगितले जाणार आहे.

योगेंद्र यादव यांच्यावर जबाबदारी

शेतकरी संघटनेकडून हे खासगी विधेयक लोकसभेच्या पटलावर आणण्यासाठी सर्व ती तयारी सुरु आहे. मात्र, आता लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी संयुक्त किसान मोर्चा या शेतकरी संघटनेची ही मागणी स्वीकारणार का? हे पाहणे महत्वाचे ठरणार

## किसान सन्मान निधीची रक्कम वाढणार

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन येत्या २३ जुलै रोजी मोदी सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळातील पहिला अर्थसंकल्प सादर करणार आहेत. या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांसाठी सरकार मोठी घोषणा करणार असल्याची माहिती समोर आली आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, पीएम किसान सन्मान निधीतील रक्कम ३० टक्क्यांनी वाढवून सुमारे ८०,००० कोटी रुपये केले जाणार आहेत.

अंतरिम अर्थसंकल्पात सरकारने पीएम किसान सन्मान निधी योजनेसाठी ६०,००० कोटी रुपयांची तरतूद केली होती, ज्यामध्ये प्रत्येक शेतकऱ्याला ६,००० रुपये वार्षिक भत्ता मिळणार होता. आता मिळालेल्या माहितीनुसार, जूनच्या शेवटच्या आठवड्यात झालेल्या बैठकीत कृषी प्रतिनिधींनी अर्थमंत्र्यांना या योजनेतील रक्कम प्रति शेतकरी ८,००० रुपये करण्याची मागणी केली आहे. त्यानुसार या योजनेतील रक्कम वाढवली जाणार आहे.



**टॅक्सद्वारे एवढा पैसा गोळा होण्याचा अंदाज**

१ फेब्रुवारी २०२४ रोजी अंतरिम अर्थसंकल्प सादर करण्यात आला, ज्यामध्ये अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी अर्थव्यवस्थेतील उत्पन्न आणि खर्चामुळे ऋ२५ साठी ज्यादा प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष कराचा अंदाज लावला होता. केंद्राने आर्थिक वर्ष २०२५ मध्ये प्रत्यक्ष करातून २१.९९ लाख कोटी रुपये आणि अप्रत्यक्ष करातून १६.३१ लाख कोटी रुपये गोळा करण्याची योजना आखली आहे.

## विजयानंतर पंकजा मुंडेंची पहिली प्रतिक्रिया

**मुंबई :** विधान परिषद निवडणुकीत पंकजा मुंडे यांचा विजय झाला आहे. या निवडणुकीत पंकजा मुंडे यांनी विजयासाठी आवश्यक कोट्यापेक्षा जास्त मते घेऊन विजय मिळवला आहे. पंकजा मुंडे विजयी झाल्यामुळे कार्यकर्त्यांकडून जल्लोष साजरा करण्यात येत आहे. तसेच, लोकसभा निवडणुकीत पराभव झाल्यानंतर अखेर पंकजा मुंडे विधान परिषदेत विजयी झाल्यामुळे त्यांचा राजकीय वनवास संपला, अशी भावना त्यांच्या कार्यकर्त्यांकडून व्यक्त केली जात आहे.



विधान परिषद निवडणुकीत विजयी झाल्यानंतर पंकजा मुंडे यांची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे. मला आनंद वाटत आहे. मी पक्षासाठी अधिक जोमाने काम करेन, असे त्या म्हणाल्या. तसेच, माझ्या विजयाचा आनंद लोकांना झाला आहे, याचा फार मला आनंद आहे. जिथे जास्त योगदान देऊ शकेन, तिथं चांगलं काम करेन. आता राज्यात काम करण्याची संधी मिळाली आहे, या निवडणुकीत ज्यांनी मदत केली. त्या सर्वांचे आभार मानते. लोकांच्या चेहऱ्यांकडे पाहून आनंद वाटतोय, असेही पंकजा मुंडे म्हणाल्या.

दरम्यान, २०१९ मधील विधानसभा आणि २०१४ मधील लोकसभा निवडणुकीतील पराभवानंतर पंकजा मुंडे यांनी कमबॅक केले आहे. पंकजा मुंडे यांचा राजकीय वनवास संपल्याने त्यांच्या समर्थकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. विधान परिषद निवडणुकीत विजयी होण्यासाठी २३ मतांचा कोटा पूर्ण करणे आवश्यक होते. मात्र पंकजा मुंडे यांनी त्यापेक्षा ३ मतं जास्त म्हणजेच २६ मतं मिळवत विजय मिळवला आहे.

**मुंडे कुटुंबीय भावनिक!**

**पंकजा मुंडे यांच्या विजयाचा मुंडे कुटुंबीयांना मोठा आनंद झाला आहे. संपूर्ण मुंडे कुटुंब विधानसभा परिसरात एकत्र पाहायला मिळाले. पंकजा मुंडे यांच्या या विजयानंतर त्यांच्या बहीण आणि माजी खासदार प्रीतम मुंडे यांनी प्रतिक्रिया देताना आज सर्वात मोठा आनंद झाल्याचे म्हटले. यावेळी, प्रीतम मुंडे यांच्या डोळ्यात आनंदाचे अश्रू पाहायला मिळाले.**

## विधानपरिषद निवडणुकीतील विजयानंतर देवेंद्र फडणवीसांची पहिली प्रतिक्रिया

**मुंबई :** विधानपरिषदेच्या ११ जागांसाठी आज निवडणूक पार पडली. या निवडणुकीत महायुतीच्या नऊ तर महाविकास आघाडीच्या दोन उमदेवारांचा विजय झाला. दरम्यान, या निकालानंतर आता विविध राजकीय प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. महायुतीच्या या विजयानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीदेखील प्रतिक्रिया दिली असून या विजयाबाबत आनंद व्यक्त केला आहे. ते विधिमंडळ परिसरात माध्यमांशी बोलत होते.

**नेमकं काय म्हणाले देवेंद्र फडणवीस?**

आज महायुतीसाठी आनंदाची गोष्ट आहे. आमचे नऊ उमेदवार निवडून आले आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात आम्ही जेव्हा नऊ जागा लढवण्याचा निर्णय घेतला, त्यावेळी अनेक जण वल्गना करत होते. आमचे उमेदवार पडतील, अशा प्रकारे सांगितले जात होतं. मात्र, आज आम्हाला आमची मते मिळाली, पण महाविकास



आघाडीची मतेदेखील आम्हाला मिळाली आहेत, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

**मी मनापासून अभिनंदन करतो**

या निवडणुकीत आमच्या राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडे यादेखील विजय झाल्या आहेत. आमचे निवडून आलेले नऊ उमेदवार बघितले, तर सर्व उमेदवार हे सर्वसाधारण कुटुंबातील आणि जनतेसाठी काम करणारे आहेत. या निवडणुकीत निवडून आलेल्या महायुतीच्या सर्व नऊ उमेदवारांचे मी मनापासून अभिनंदन करतो, अशी प्रतिक्रियाही देवेंद्र फडणवीस यांनी दिली. पुढे बोलताना विधानपरिषद निवडणुकीप्रमाणेच विधानसभा निवडणुकीतही महायुतीचा विजय होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

**महायुतीच्या नऊ तर महाविकास आघाडीच्या दोन उमेदवारांचा विजय**

दरम्यान, आज झालेल्या विधानपरिषद निवडणुकीत महायुतीच्या नऊ तर महाविकास आघाडीच्या दोन उमेदवारांचा विजय झाला. या निवडणुकीत भाजपाच्या पंकजा मुंडे यांनी २६, योगेश टीळेकर यांना २६, परिणय फुके यांना २६, तसेच अमित गोरखे आणि सदाभाऊ खोत यांनी प्रत्येकी २६ मते मिळाली. महत्त्वाचे म्हणजे प्रत्येक उमेदवाराला विजयासाठी केवळ २३ मतांची आवश्यकता होती. सदाभाऊ खोत वगळता २३ मतांचा कोटा भाजपाच्या पाचही उमेदवारांनी पहिल्या फेरीतच पूर्ण केला.

भाजपा बरोबरच महायुतीतील शिंदे गटाच्या दोन, तर अजित पवार गटाच्या दोन्ही उमेदवारांचा विजय झाला. अजित पवार गटाच्या राजेश विटेकर यांना २३, तर शिवाजीराव गर्जे हे २४ मते मिळाली. तर शिंदे गटाच्या भावना गवळी यांना २५, तर कृपाल तुमाने यांना २६ मते मिळाली. विशेष म्हणजे अजित पवार गटाकडे केवळ ४२ मते होती. मात्र, असे असतानाही त्यांना ४७ मते मिळाली. या निवडणुकीत महाविकास आघाडीच्या मिलिंद नार्वेकर आणि प्रज्ञा सातव यांच्यादेखील विजय झाला. तर शेकापचे जयंत पाटील यांना पराभवाचा सामना करावा लागला.

## संत तुकाराम महाराज पालखी वारी अकलूजला मुक्कामी

**अकलूज :** संत तुकोबारायांच्या पालखी सोहळ्याचे अकलूज नगरीत प्रस्थानानंतर १५ व्या दिवशी आगमन झाले. नगर प्रदक्षिणा करत सोहळ्यातील दुसरे रिंगण अकलूजच्या सदाशिवराव माने विद्यालयाच्या प्रांगणात पार पडले. सकाळी ९. ३० वाजता अकलूज नगरीत पालखीचे आगमन झाले. नगरखाना, दिंड्या,मानाचे अश्व यांच्यासह वारकऱ्यांनी नगर प्रदक्षिणा केली आणि या सर्वांच्या आगमन विद्यालयाच्या प्रांगणामध्ये झाले.

शिक्षण प्रसारक मंडळाचे अकलूजचे अध्यक्ष संग्राम सिंह मोहिते पाटील व त्यांच्या सुविद्य पत्नी ऋतुजादेवी मोहिते पाटील यांच्या शुभहस्ते पादुकांचे पूजन करण्यात आले. त्यानंतर मानाच्या अश्वाचे व स्वाराच्या अश्वाचे पूजन माढ्याचे खासदार धैर्यशील मोहिते पाटील व त्यांच्या पत्नी शितलदेवी मोहिते पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

यानंतर पालखी सोहळ्यातील पताकाधारी अबाल वृद्ध वारकरी, हंडा व तुळशी वृंदावन धारक महिला वारकरी, विणेकरी, टाळकरी यांचे नेत्र दीपक रिंगण पार पडले. ज्ञानोबा -तुकारामचा गजर, टाळ, मृदुंग,पखवाज यांचा नाद, जल्लोष आणि उत्साहाच्या वातावरणात मुख्य रिंगण सोहळ्याला सुरुवात झाली. वरूणराजाच्या तुरळक स्वागताने थोडा काळ सर्व परिसर सुखावला असला तरीही, वरूणराजाची प्रतीक्षा ही रिंगण सोहळा पूर्ण झाल्यानंतर पूर्णत्वास आली.

वारकऱ्यांचा जल्लोष, उत्साह, टाळ मृदुंगाच्या नादात मानाचा अश्व पुढे व त्यामागे मोहिते पाटील यांचा 'बलराज ' यांचा रिंगण सोहळा समस्त उपस्थित समुदाय डोळ्यात प्राण आणून साठवत होता. अश्वांच्या पाऊलखुणाची माती कपाळाला लावण्यासाठी वारकऱ्यांची धांदल उडत होती, त्याचवेळी ज्ञानोबा माऊलीचा गजर, टाळ -मृदुंग- पखवाज यांचा नाद आणि वारकऱ्यांच्या नामघोषाने परिसर दुमदुमून गेला होता. शिंगाडे वाजवून रिंगणाची सांगता करण्यात आली. आज समस्त वैष्णवांचा मुक्काम विठ्ठल रुक्मिणी मंदिरात होणार आहे.

याप्रसंगी माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, नंदिनीदेवी मोहिते पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे, मुख्याधिकारी दयानंद गोरे, मदनसिंह मोहिते पाटील, कुलगुरू प्रकाश महानवर, स्वयंप्रभादेवी मोहिते पाटील, सत्यप्रभादेवी मोहिते पाटील, शिवतेजसिंह मोहिते पाटील, स्वरूपाराणी मोहिते पाटील, सत्यशील शिरकर (जुन्नर ), किशोरसिंह माने पाटील यांची उपस्थिती होती.

# उदघाटनाआधीच बालवाडी इमारत खिळखिळी

## काटवली येथील इमारतिच्या भिंती भेगाळल्या फरशी खचली ; ठेकेदाराची चौकशी करावी

**वाई :** काटवली (तालुका जावली) येथे उभारण्यात आलेल्या बालवाडी इमारतीचे काम उद्घाटना आधीच खिळखिळे झाले असून भिंतींना मोठमोठ्या भेगा पडल्या असून ठिकठिकाणी फरशी खचली आहे. यामुळे या ठेकेदाराच्या कामाबाबत चौकशी व्हावी अशी ग्रामस्थांनी मागणी केली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की काटवली तालुका जावली येथे दोन वर्षांपूर्वी अंगणवाडी इमारतीसाठी शासकीय योजनेतून निधी उपलब्ध झाला. या कामाला ज्या मुख्य ठेकेदाराला काम दिले होते. त्या ठेकेदाराने आपल्या दुसऱ्या सब ठेकेदाराकडून हे काम करून घेतले आहे. अद्यापही या इमारतीचे उद्घाटन झाले नसून यामध्ये तात्पुरत्या स्वरूपात बालवाडीच्या मुलांना बसवले जात आहे.



परंतु गेले चार महिन्यापूर्वी या नव्या कोऱ्या अंगणवाडीच्या इमारतीच्या भिंतींना मोठमोठ्या भेगा पडल्या असून ठिकठिकाणी फरशी खचून फुटली आहे.

याबाबत या ठेकेदाराशी संपर्क साधला असता त्याने उडवा उडवीचे उत्तरे देऊन हा प्रकार टाळण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे उद्घाटना आधीच गावाची जागा तसेच शासनाचा निधी याचा अपव्य झाल्याचा दिसून येत आहे.

**या इमारतीचे अद्यापही लोकार्पण केलेले नाही त्या आधीच या इमारतीचा बोऱ्या वाजल्याने ठेकेदाराच्या निकृष्ट कामाबाबत सर्वत्र चर्चा होत आहे. त्यामुळे शासनाच्या निधीचा अपव्यय होत असल्याचे दिसून येत आहे. या घटनेने शाळेच्या मुलांचे मात्र नुकसान होणार आहे.**

“

**संबंधित शाळेच्या ठेकेदाराने स्वतः काम करण्याऐवजी दुसऱ्याला काम दिले. त्याने ते काम रात्रीच्या वेळी कशाही पद्धतीने उरकले आहे. त्यामुळे बांधकामांचे नियम त्यांनी अक्षरशः धाब्यावर बसवले आहेत. त्यामुळे ही परिस्थिती ओढवली आहे. हे काम त्यांनी तातडीने करून द्यावे अशी आमची ग्रामस्थांची कळकळीची मागणी आहे.**

**- माजी सरपंच हणमंत बेलोशे**

शिक्षण विभागाने पाहणी करून ही इमारत भेगाळल्याने या ठिकाणी शाळा भरवू नये आशा सूचना केल्या आहेत.

त्यामुळे इमारत असून अडचण आणि नसून खोळंबा अशी अवस्था झाली आहे. संबंधित ठेकेदार व अधिकारी पाहणी करून गेले परंतु कसलीही कार्यवाही त्यांनी केली नाही. त्यामुळे अंगणवाडी मुलांचा प्रश्न गंभीर झाला आहे. निकृष्ट दर्जाचे काम ठेकेदाराने केल्याचे निदर्शनास येत आहे. त्यामुळे या कामाची चौकशी करून या इमारत दुरुस्तीचे काम त्या ठेकेदाराने सुधारितपने व तातडीने करावे अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

# पीपल्स रिपब्लिकन प.महाराष्ट्र उपाध्यक्षपदी रमेश उबाळे

## रमेश उबाळेना पार्टीत स्वातंत्र्य देऊ- जोगेंद्र कवाडे

**कोरेगाव :** राष्ट्रवादी जिल्हा सामाजिक न्याय विभागाचे माजी अध्यक्ष रमेश उबाळे यांनी बुधवारी पीपल्स रिपलीकन पार्टीमध्ये केला. हा प्रवेश मुंबई येथील पार्टी कार्यालयात झाला यावेळी पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे अध्यक्ष जोगेंद्र कवाडे व राष्ट्रीय कार्याध्यक्ष जयदीप कवाडे यांनी स्वागत करून पदाचे नियुक्ती पत्र प्रदान करत रमेध उबाळे यांना पीपल्स रिपब्लिकन पार्टीमध्ये काम करण्याचे पूर्णपणे स्वातंत्र्य देऊ अशी ग्वाही जोगेंद्र कवाडे यांनी दिली.

रमेश उबाळे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) काँग्रेसला सोडचिठ्ठी देत आपल्या पदाचा नुकताच राजीनामा दिला होता. त्यामुळे ते पूर्वाश्रमीच्या आ. महेश शिंदे गटात की आंबेडकरवादी गटात जाणार याची चर्चा राजकिय वर्तुळात होती. अखेर त्यांनी पीपल्स रिपब्लिकन पार्टीमध्ये प्रवेश केला आहे. रमेश उबाळे यांनी यापूर्वी आ. महेश शिंदे यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टीमध्ये विविध पदावर काम केले आहे. तसेच गेली चार वर्षे ते राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सामाजिक न्याय विभागात काम करत होते.

रमेश उबाळे यांनी कोरेगाव सातारा खटाव विधानसभा मतदार संघासह जिल्ह्यात अनेक आंदोलन करून आपली स्वतःची शक्ती निर्माण केली आहे यामध्ये साठ वर्षाचा सिद्धार्थनगर येथील पाण्याचा प्रलंबित प्रश्न, भीम नगर रेल्वे यामध्ये गेलेली जमीनीच्या बदल्यात मोबदला मिळाला नव्हता त्यासाठी त्यांनी मोठं आंदोलन करून वेळे प्रसंगी स्वतःच्या जीवाची ही पर्वा केली नाही मागासवर्गीय बांधवांना न्याय मिळवून दिला सिद्धार्थ नगर येथील मागासवर्गीयांना पाण्यापासून वंचित ठेवणाऱ्या शासकीय अधिकाऱ्यांना धारेवरती धरून आंदोलनाचा इशारा दिला व पाठपुरावा करून पाण्याचा



प्रश्न मार्गी लावला कोरेगावमधून साताऱ्याला जण्यासाठी युवकांना कॉलेजला व परीक्षेला जात असताना एस .टी. उपलब्ध होत नव्हत्या याकरिता मोठे आंदोलन करून त्रिपुटी ते कोरेगाव रस्ता रोको करून चक्काजाम केला व सर्वसामान्य शेतकरी व कष्टकरी पालकांच्या युवकांना न्याय मिळवून दिला मागासवर्गीय समाजाचे वेळोवेळी प्रश्न मार्गी लावले.

कोणताही व्यक्ती अडचण प्रश्न घेऊन आल्यास त्याला त्याची जात त्याचा पक्ष विचारत न घेता त्यांचे प्रश्न रमेश उबाळे यांनी मार्गी लावले आपण फक्त आपलं काम सांगा की काम करून द्यायची जबाबदारी माझी तेही कोणाचा साधा चहा सुद्धा न घेता राजकारण समाजकारण करत असताना कायम अर्थकारणाला बाजूला ठेवून फक्त न्याय मिळवून देण्याची भूमिका कायमच रमेश उबाळे यांनी ठेवली आहे.

रमेश उबाळे यांनी ल्हासुर्णेची पोल्ट्री हटाव आंदोलन, विद्यार्थ्यांना वेळेवर एस.टी. बस मिळावी म्हणून केलेले चक्का जाम आंदोलन, कोरेगाव नगर पंचयतीविरुद्ध केलेले उपोषण, हंडा मोर्चा आंदोलन सर्वच आंदोलनाची प्रशासकीय पातळीवर चर्चा झाली. सातारा-पंढरपूर, सातारा-पुणे राष्ट्रीय महामार्गाच्या कामात राहिलेल्या त्रुटी, ठेकेदारानी केलेला भ्रष्टाचार त्यांनी आंदोलनाच्या माध्यमातून रमेश उबाळे यांनी लोकांसमोर आणला. त्यांनी केलेल्या आंदोलनाची दखल घेऊन मोठमोठ्या अधिकाऱ्यांन जबाब देण्यासाठी साताऱ्यात जिल्ह्याधिकारी कार्यालयात यावे लागले. रमेश उबाळे यांच्या आंदोलनात मोठी ताकद असल्याची चर्चा कोरेगाव विधानसभा मतदारसंघात तसेच जिल्ह्यात असते.

समाजातील तळागाळातील घटकांना मदत, गोरगरीब कुटूंबातील विद्यार्थ्यांना मोफत शालेय साहित्य देणे, गरीब कुटुंबातील रुग्णांना आर्थिक सहाय्य करणे, अंध-अपंग लोकांना आर्थिक सहाय्य करणे, यामुळे तमेश उबाळे जणू हा छंद असल्याने या सामाजिक कार्यामुळे उबाळे यांचे नाव समाजतील शेवटच्या घटकापर्यंत पोहचले आहे.

पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे अध्यक्ष जोगेंद्र कवाडे यांनी आपणावर पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष पदाची जबाबदारी सोपवली आहे. संपूर्ण पश्चिम महाराष्ट्रात आपण पार्टीची ताकद वाढविण्यासाठी प्रयत्न करणार असून मागासवर्गीय लोकांना न्याय मिळवून देण्यासाठीच आपण निळ्या झेंड्याखाली येऊन काम करण्याचा निर्णय घेतल्याचे रमेश उबाळे यावेळी म्हणाले.

# कोरेगाव येथील नितीन बोतालजी यांना भीम योध्दा पुरस्कार जाहीर

**कोरेगाव :** कोरेगाव शहरातील रिपब्लिकन पक्षाचे कोरेगाव तालुका अध्यक्ष (आठवले गट) नितीन बोतालजी यांना आदर्श भीम योद्धा हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

हा पुरस्कार रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (-) पक्षाचे महाराष्ट्र उपाध्यक्ष व सातारा जिल्हा अध्यक्ष दादासाहेब ओव्हाळ आणि महाराष्ट्र संघटक कैलास जोगदंड साहेब यांच्या हस्ते देण्यात आला.

नितीन बोतालजी यांनी अनेक वर्षापासुन कोरेगाव




तालुक्या मध्ये छत्रपती शिवाजी महाराज, फुले शाहू आंबेडकर तसेच अण्णा भाऊ साठे, संत गाडगे महाराज या महामनवाचा विचारांचा प्रसार व प्रचार पोहचवण्याचे काम केले. व छोटया मोठया गाव गावातून परिवर्तनाची चळवळ सुरु केली. ही चळवळ तालुक्यातील गावागावांत पोहचली. नितीन बोतालजी यांनी खुप वर्ष दादासाहेब ओव्हाळ यांच्या सोबत साधा व कार्यकर्ता म्हणून प्रामाणिक काम केले. म्हणून नितीन बोतालजी हा युवा कार्यकर्ता आंबेडकरी चळवळ जोमाने पुढील काळात चालवेल अश्या विश्वासाने दादासाहेब ओव्हाळ यांनी बोतालजी यांना सर्वप्रथम कोरेगाव शहर कार्याध्यक्षपदी नेमणूक केली. त्यानंतर कोरेगाव शहराध्यक्ष व कोरेगाव तालुका अध्यक्ष पद देऊन मागास, दलितांच्या विकासासाठी काम करण्याची संधी दिली.

नितीन बोतालजी यांच्या प्रामाणिक समाजकार्याची दखल घेत दादासाहेब ओव्हाळ यांनी नितीन बोतालजी यांना भिम योद्धा हा पुरस्कार देऊन सन्मानित केले. त्यावेळी सातारा जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील रिपब्लिकन पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बिचुकले येथे आमदार शशिकांत शिंदे गटातील शेकडो कार्यकर्त्यांचा आमदार महेश शिंदे गटात प्रवेश

**कोरेगाव :** बिचुकले (तालुका कोरेगाव) येथील आमदार शशिकांत शिंदे यांच्या गटातील शेकडो मातंग व नाईक समाजातील पुरुष व महिलां तसेच युवकांनी विकास कामांना प्राधान्य देत आमदार महेश शिंदे यांच्या गटात जाहीर प्रवेश केला.या कार्यकर्त्यांनी प्रवेश करताच या समाजासाठी तत्काळ १० ते १५ लाख रु चे सांस्कृतिक भवन देण्याचे आमदार महेश शिंदे यांनी सांगितले

कोरेगव तालुक्यात हजारो कोटी रुपयांची विकासकामे करणारे आमदार महेश शिंदे यांच्या माध्यमातून बिचुकले गावात शेकडो कोटीची विकास कामे झाली असून काही विकास कामांना मंजुरी मिळाली अश्या विकासाभूमिक नेतृत्वाला यापुढे साथ देण्यासाठी गावातील मातंग व नाईक समाजातील शेकडो युवकांनी प्रवेश केला असून या लोकांच्या विकासाला आमदार महेश शिंदे कुठेही कमी पडणार नाहीत अशा भावना कोरेगाव तालुका शिवसेना उप तालुकाप्रमुख चंद्रकांत पवार यांनी सांगितले.

यावेळी माजी पंचायत समिती सदस्य विलास काका पवार,विशाल कदम, उद्योजक अमर शेठ पवार, ग्रामपंचायत सदस्य विश्वास आढागळे, किरण पवार नितीन लोखंडे, राजेंद्र पवार, बाळू शिरतोडे, भाऊ शिरतोडे, अंकुश शिरतोडे, आनंदा सोनवणे, चंदू मदने, दिलीप आढागळे, शेखर बोडरे,उपस्थित होते.

# मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सातारा जिल्ह्यातील खेडोपाडी पोहोचवणार

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्याध्यक्ष अमितदादा कदम यांचे प्रतिपादन

**सातारा :** मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना ही सातारा जिल्ह्यातील तळागाळातील लोकांबरोबरच खेडोपाडी पोहोचवणार असल्याचे प्रतिपादन सातारा जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्याध्यक्ष अमितदादा कदम यांनी केले आहे.

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेबाबत बोलताना सातारा जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्याध्यक्ष अमितदादा कदम म्हणाले, राज्य सरकारच्या वतीने उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी अर्थसंकल्पात महिलांसाठी एका खास योजनेची घोषणा केली. मुख्यमंत्री- माझी लाडकी बहीण योजना असं या योजनेचे नाव आहे. या योजनेत अल्प उत्पन्न गटातील २१ ते ६५ वयोगटातील महिलांना शासनाकडून ही आर्थिक मदत दिली जाणार आहे. या योजनेच्या माध्यमातून महिलांना दर महिन्याला १५०० रुपये दिले जाणार आहेत. ज्या कुटुंबांकडे ५ एकरपेक्षा जास्त जमीन आहे त्यांना आधी या योजनेचा लाभ मिळणार नव्हता. पण नंतर ही अट काढून टाकण्यात आली आहे. ज्यांचे कौटुंबिक उत्पन्न २.५० लाख रुपयांपेक्षा कमी आहे अशा कुटुंबातील महिलांना या योजनेचा लाभ घेता येणार आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी राज्यभरातून महिलांचा मोठा प्रतिसाद मिळत असून राज्यातील महिला या योजनेचा फायदा करुन घेण्यासाठी प्रयत्न करत आहेत.

पुढे बोलताना ते म्हणाले, सातारा जिल्ह्याचा विचार करता सरकारने माता भगिनींसाठी आणलेल्या या योजनेचे सर्वच मुली-महिलांनी उत्स्फूर्त स्वागत केले आहे. यानंतर योजना आपल्या दारी या माध्यमातून घरी बसून महिलांना या योजनेची नोंदणी करता येणार आहे. त्यामुळे ही योजना सर्वसामान्य महिला-मुलींपर्यंत पोहोचावी यासाठी सातारा राष्ट्रवादी काँग्रेस तळागाळापर्यंत जात खेड्यापाड्यापर्यंत पोहोचत आहे. यापासून महिलांना काम मिळावे, तसेच जास्तीत जास्त महिलांपर्यंत ही योजना पोहोचावी यासाठी लवकरच एक शिबीर आयोजित करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

यावेळी महिला प्रदेश उपाध्यक्षा स्मिता देशमुख, वैद्यकीय मदत कक्षाचे राज्य उपाध्यक्ष सरदार (सागर) भोगांवकर, सातारा जिल्हा महिला कार्याध्यक्षा सीमा जाधव, निवास शिंदे, अंगणवाडी सेविका उपस्थित होत्या.

# सातारा जिल्ह्यात खरीप पेरणी अडीच लाख हेक्टरवर

**सातारा :** जिल्ह्यातील खरीप हंगाम पेरणी अंतिम टप्प्यात असून अडीच लाख हेक्टरवर पूर्ण झाली आहे. हे प्रमाण ८७ टक्के इतके झाले आहे. त्यामुळे यंदा चांगल्या पावसामुळे वेळेत पेरणी पूर्ण होणार असल्याचे दिसून येत आहे.

जिल्ह्यात खरीप आणि रबी असे दोन हंगाम मोठ्या प्रमाणात घेण्यात येतात. जिल्ह्यातील खरीप हंगामाचे सर्वसाधारण क्षेत्र हे २ लाख ८८ हजार ४९४ हेक्टर निश्चित करण्यात आले आहे. यामध्ये भाताचे सुमारे ४४ हजार हेक्टर, खरीप ज्वारी ११ हजार, बाजरी ६० हजार ७३४ हेक्टर, मका १४ हजार ३६९, भुईमूग २९ हजार ४३५ आणि सोयाबीनचे सर्वाधिक ७४ हजार ८०० हेक्टर राहणार असल्याचा अंदाज आहे, तसेच तूर, मूग, उडीद, कारळा, सूर्यफुलाचे क्षेत्र अत्यल्प आहे.

मान्सूनच्या पावसावरच खरीप हंगाम घेण्यात येतो. पाऊस वेळेत आणि चांगला झाला तर पेरणी लवकर होते. यंदा पावसाला वेळेवर आणि दमदार सुरुवात झाली. त्यामुळे खरीप हंगामातील पेरणीही वेळेवर सुरू झाली, तसेच पेरणीला वेगही आला होता. त्यामुळे आतापर्यंत ८७ टक्क्यांवर पेरणी पूर्ण झालेली आहे. सध्या २ लाख ५० हजार ७५१ हेक्टर क्षेत्रावर पीक आहे. यामुळे लवकरच पेरणी पूर्ण होणार आहे.

आतापर्यंत भाताची ५६ टक्के लागण झालेली आहे. २४ हजार ४९२ हेक्टरवर लागण करण्यात आली आहे. अजूनही पश्चिम भागात भात लागणीची कामे सुरूच आहेत, तर ज्वारीची ६ हजार ८१० हेक्टरवर पेरणी झाली. हे प्रमाण ६१ टक्के आहे. बाजरीची पेरणी ६४ टक्के झाली आहे. सुमारे ३९ हजार हेक्टरवर पेरणी झाली असून यंदा या पिकाखालील क्षेत्र कमी होण्याचा अंदाज आहे.

मका पिकाची सर्वाधिक ९५ टक्के क्षेत्रावर पेर झाली आहे. १४ हजार ३६९ हेक्टर पेरणी झाली आहे, तर भुईमुगाची ९१ टक्के म्हणजेच सुमारे २७ हजार हेक्टरवर पेरणी पूर्ण झाली आहे. यंदाही सोयाबीन क्षेत्र वाढणार आहे. आतापर्यंत सुमारे ८७ हजार हेक्टरवर पेरणी झाली. हे प्रमाणत ११६ टक्के झाले आहे. सोयाबीनला बऱ्यापैकी दर मिळत असल्याने शेतकऱ्यांचा कल सोयाबीनकडे असल्याचे दिसून येत आहे.

खंडाळा तालुक्यात १२७ टक्के क्षेत्रावर पेरणी..

जिल्ह्यात यावर्षी वेळेत पाऊस सुरू झाल्याने पेरणीलाही वेग आला. त्यामुळे खंडाळा तालुक्यात आतापर्यंत १२७ टक्के पेरणी झालेली आहे. तालुक्यातील खरीप क्षेत्र १० हजार ५५६ हेक्टर आहे, तर पेरणी १३ हजार ४५० हेक्टरवर झाली आहे. सातारा तालुक्यात १८ हजार हेक्टरवर पेरणी झाली. हे प्रमाण ८६ टक्के आहे. जावळीत ११ हजार हेक्टरवर पेरणी झाली असून ६१ टक्के प्रमाण राहिले आहे, तसेच पाटण तालुक्यातील ४० हजार ३६२ हेक्टरवर पेर झाली आहे. कऱ्हाड तालुक्यात ९२ टक्के पेरणी पूर्ण झाली आहे. सध्या ३५ हजार हेक्टरवर पिके आहेत.

कोरेगाव तालुक्यात ९० टक्के पेरणी झाली. आतापर्यंत १८ हजार ७०९ हेक्टरवर पिके घेतली आहेत. खटाव तालुक्यात ८२, तर माणमध्ये ९६ टक्के क्षेत्रावर पेर झाली आहे. खटावमध्ये ३७ हजार, तर माण तालुक्यात ३८ हजार हेक्टर क्षेत्र पेरणीखाली आले आहे. फलटणला ७९, वाई तालुक्यात ८४ टक्के पेरणी पूर्ण झाली आहे. महाबळेश्वर तालुक्यात फक्त ५३ टक्के पेरणी झालेली आहे.

# सातारा- जावलीतील २६ ग्रामपंचायत इमारतींच्या बांधकामासाठी ५ कोटी २० लाख

## आ. शिवेंद्रसिंहराजेंचा पाठपुरावा; राज्याच्या ग्रामविकास विभागाकडून मिळवला निधी

**सातारा :** सातारा- जावली विधानसभा मतदारसंघातील २६ ग्रामपंचायतींच्या नवीन इमारत बांधकामासाठी आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या माध्यमातून तब्बल ५ कोटी २० लाख रुपये निधी मंजूर झाला आहे. राज्याच्या ग्रामविकास विभागामार्फत मा. बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी या योजनेतून हा निधी मंजूर झाला असून मंजूर निधीतून सातारा तालुक्यातील १३ आणि जावली तालुक्यातील १३ ग्रामपंचायतींना नवीन स्वतंत्र कार्यालय इमारत बांधून मिळणार आहे.

आ. शिवेंद्रसिंहराजेंच्या पाठपुराव्यातून हा निधी मंजूर करण्यात आला असून नवीन इमारतींमुळे या २६ ग्रामपंचायतींच्या कामकाजात सुरळितपणा येण्यास मदत होणार आहे. सातारा तालुक्यातील वेणेखोल, बेंडवाडी, मोरेवाडी, निगुडमाळ, पिलाणी, मस्करवाडी, वावदरे, राकुसलेवाडी, आरगडवाडी, बोपोशी, चाळकेवाडी,



साबळेवाडी आणि पेट्री-अनावळे या गावातील ग्रामपंचायत कार्यालयाची नवीन इमारत बांधण्यासाठी प्रत्येकी २० लाख रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे.

जावली तालुक्यातील कुंभारगणी, शिंदेवाडी, अंधारी कास, मरडमुरे, पानस, म्हाते बु., केसकरवाडी, काटवली, वरशी, रानगेघर, बामणोली कसबे, मोहाट आणि नांदगणे या ग्रामपंचायतींच्या नवीन कार्यालय इमारत बांधकामासाठी प्रत्येकी २० लाख रुपये निधी मंजूर झाला आहे. निविदा प्रक्रिया व इतर शासकीय सोपस्कार तातडीने पूर्ण करून मंजूर इमारतींचे बांधकाम त्वरित सुरु करा. कामे दर्जेदार करून वेळेत पूर्ण करा, अशा सूचना आ. शिवेंद्रसिंहराजेंनी बांधकाम विभागाला केल्या आहेत.

# झाडानी प्रकरणात संबंधितांना २९ जुलैला शेवटची संधी

**कागदपत्रे, म्हणणे मांडण्यासाठी मुदत**

**सातारा :** सहयाद्री वाचवा मोहीमेतंर्गत सामाजिक, माहिती अधिकार कार्यकर्ते सुशांत मोरे यांनी उघडकीस आणलेले झाडानी प्रकरण सध्या चांगलेच गाजत आहे. विधीमंडळाच्या अधिवेशनात याविषयी खडाजंगी चर्चा झाल्यानंतर गुरुवारी अप्पर जिल्हाधिकारी जीवन गलांडे यांच्यासमोर सुनावणी झाली. यावेळी नोटीस बजावलेले संबंधित हजर होते. यावेळी संबंधितांनी म्हणणे मांडले आणि काही कागदपत्रे दिली आणि उर्वरित कागदपत्र सादर करण्यासाठी आणखी मुदत देण्याची मागणी केली. त्यावर अप्पर जिल्हाधिकारी जीवन गलांडे यांनी दि.२९ जुलै ही तारीख देत ही म्हणणे मांडण्यासाठी आणि कागदपत्रे सादर करण्यासाठी शेवटची संधी असल्याचे सांगितले.

झाडाणी (ता. महाबळेश्वर) येथील तब्बल ६४० एकर जमीन जीएसटी आयुक्त चंद्रकांत वळवी आणि त्यांच्या नातेवाईकांनी बळकावल्याचे कागदपत्रांवरुन स्पष्ट झाले होते. याप्रकरणी पहिल्यांदा तिघांना आणि नंतर आठ जणांना नोटीसा बजावण्यात आल्या होत्या. आज झालेल्या सुनावणी वेळी जीएसटी आयुक्त चंद्रकांत वळवी, अनिल वसावे, संगीता वळवी, अरमान वळवी यांच्यासह संबंधित उपस्थित होते. यावेळी त्यांनी आपले म्हणणे मांडले आणि काही कागदपत्रे सादर केली परंतु अजून काही कागदपत्र सादर करण्यासाठी मुदत मागितली असता अप्पर जिल्हाधिकारी जीवन गलांडे यांनी २९ जुलै ही तारीख देत ही शेवटची संधी असून त्यावेळेस संबंधित सर्व कागदपत्रे आणि म्हणणे मांडण्यास सांगितले आहे.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902


# सरकारला म. फुलेंच्या शिल्पसृष्टीची ॲलर्जी

## सभागृहात चर्चा का होत नाही: साहित्यिक अरुण जावळे

**सातारा :** छत्रपती शिवाजी महाराजांवर पहिला पोवाडा लिहिणारे व सर्वप्रथम शिवरायांची जयंती साजरी करणारे समाजक्रांतिकारक जोतीराव फुले यांची कटगुण ही कुलभूमी आहे. त्यांच्या पत्नी भारतातील पहिल्या स्त्री शिक्षिका सावित्रीमाई फुले यांची जन्मभूमी असलेलं नायगांव हेही याच जिल्ह्यात. सातारच्यादृष्टीने या दोन्ही गोष्टी अभिमानास्पद व गौरवपूर्ण अशाच आहेत. नायगांव येथे काही वर्षापूर्वी शिल्पसृष्टी साकारुन सावित्रीमाईंच्या ऐतिहासिक स्मृतींना उजाळा देण्याचे काम शासनाने केले. परतु, जोतीराव फुले यांच्या कटगुण या कुलभूमीत मात्र शिल्पसृष्टी अद्यापही साकारली नाही. वास्तविक या शिल्पसृष्टीचा मुद्दा जिल्हा प्रशासनापासून ते मंत्रालयापर्यंत वारंवार समोर आणला असताना ऐन अधिवेशन काळात यासंबधी सातारा जिल्ह्यातील एकही लोकप्रतिनिधी सभागृहात बोलत नाही, हा म. फुलें यांचा अवमान आहे. शासनही याबाबत भूमिका घेत नसल्याने महात्मा फुलेंचे यांना लर्जी आहे काय ? असा प्रश्नांकित आरोप साहित्यिक अरुण जावळे यांनी एका प्रसिध्दी पत्रकाद्वारे केला आहे. केला.

अरुण जावळे यांनी पुढे असे म्हटले आहे की, ११ ते १२ वर्षापूर्वी कटगुणच्या शिल्पसृष्टीबाबत प्रशासन स्तरावर चर्चा झाली. त्यानंतर जिल्हापरिषदेत ठरावही मंजूर झाला. मंत्रालयस्तरावरही हालचाली झाल्या. तथापि या शिल्पसृष्टीला मूर्तरुप आले नाही. खरंतर, ही बाब खेदजनक आहे. ज्या फुले दांम्पत्याचा वारसा हा सातारा जिल्हा मोठ्या अभिमानाने महाराष्ट्रभर सांगतो, त्या जिल्ह्यातील चक्क जोतीरावांच्या कुलभूमीत शिल्पसृष्टी होत नाही, हा एका अर्थाने जोतीरावांचा घोर अवमान आहे. शासनाकडे म. फुलेंची विचारदृष्टी नसल्यानेच हे घडत असून किमान यापुढेतरी शासनाने शिल्पसृष्टीकडे दुर्लक्ष करू नये. दोन कोटींची तरतूद करून शिल्पसृष्टी लवकर कशी साकारता येईल याबाबत मुख्यंत्री एकनाथ शिंदे यांनी गाभीर्याने विचार करावा. सातारा जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधीनी यासाठी पुढाकार घेऊन खऱ्या अर्थाने एका महात्म्याला अभिवादन करावे.

जोतीराव फुले हे आधुनिक महाराष्ट्रातील मूलगामी समाज परिवर्तनाच्या चळवळीचे आद्यप्रवर्तक होत. कर्जबाजारपणापायी हैराण झालेल्या शेतकऱ्यांची गा-हाणे फुले यांनी वेशीवर टांगली. समाजातील अगदी शेवटच्या तळाच्या थरातील माणसांच्या दुःखाशी समरस होऊन सामाजिक न्यायाच्या आणि समतेच्या त्यांनी चळवळी केल्या. न्याय आणि समता यावर आधारलेली समाजरचना अस्तित्वात आणण्याचा ध्येयवाद फुले दांम्पत्याने



अंगीकारला. इतकेच नव्हेतर त्यासाठी ते अखेरपर्यंत झटले. १८४८ ला मुलींची पहिली शाळा सुरू करून जोतीरावांनी शिक्षणाचे महत्त्व विशद केले. स्त्री ही एक समाजाचा स्वतंत्र घटक आहे असून तीला प्रतिष्ठा आहे. मानवी नैसर्गिक हक्क - अधिकार तिला मिळाले पाहिजेत, असा आग्रह त्यांनी धरला. १८६९ ला छत्रपती शिवाजी महाराजांची समाधी शोधून शिवरायांचे कार्यकर्तृत्व त्यांनी जगापुढे आणले. याशिवाय सतीची चाल, बालविवाह, केशवपन अशा अनिष्ट रुढी - परंपरा विरोधात प्रखर बंड छेडले. या एकूण लढ्यात स्वतः सावित्रीमाई फुले सावलीसारख्या जोतीरावांच्या पाठीशी ठामपणे उभ्या राहिल्या, त्यामुळे तर फुले दांम्पत्याचे 'क्रांतिकारकत्व' समग्र समाज परिवर्तनाच्या चळवळीला विशिष्ट आयाम देणारे ठरले. सामाजिक उत्थानाच्या कार्यामुळे फुले दांम्पत्याचा आदर केवळ महाराष्ट्रच करत नाही, तर देशभर केला जातो.

पाच सहा वर्षापूर्वी महाराष्ट्र सरकारने जोतीराव फुले यांना भारतरत्न बहुमान मिळावा यासाठी केंद्र सरकारजवळ आग्रह धरला होता. सरकारचा हा आग्रह स्वागतार्ह असला तरी फुले यांना अद्याप भारतरत्न दिला गेला नाही, ही वस्तुस्थिती आहे. वास्तविक भारतरत्न मिळण्याबरोबरच कूलभूमीत जोतीरावांची शिल्पसृष्टी साकारावी यासाठी महाराष्ट्र सरकारने ठोस भूमिका घ्यायला हवी. यापूर्वी केंद्रीय राज्यमंत्री ना. रामदास आठवले, महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उध्दव ठाकरे यांनाही हा विषय माहित आहे. विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडेही पत्रव्यवहार झालाय, मात्र त्यांच्याकडून अद्यापही सकारात्मक हालचाल होत नाही. खरतंर, जिल्हाप्रशासनाने शिल्पसृष्टीचा प्रस्ताव तयार करुन मंत्रालयाकडे एव्हाना पाठवायला हवा होता. मात्र प्रशासनही कानाडोळा करत आहे. लोकप्रतिनिधीच्या इच्छाशक्तीचा - विचारदृष्टीचा अभाव आणि शिल्पसृष्टीबाबत कमालीची उदासिनता यामुळे प्रशाससही हालत नाही. किमान या अधिवेशनात तरी शिल्पसृष्टीबाबत ठोस निर्णय व्हावा अन्यथा जिल्ह्यातील फुलेवादी विचारप्रवर्तकांडून सत्याग्रहाची भूमिका घेतली जाईल, असा इशारा साहित्यिक अरुण जावळे यांनी दिला आहे.

# उंब्रज पोलिसांची अवैध ताडी विक्रेत्यांवर कारवाई

## पाली व उंब्रज येथील तिघांवर कारवाई,पन्नास लिटर ताडी जप्त

उंब्रज : उंब्रज पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रविंद्र भोरे यांनी उंब्रज व पाली येथील अवैध ताडी विक्री करणाऱ्यावर कारवाईचा बडगा उगारला असून दोन कारवाईत एक हजार रुपये किमतीचा पन्नास लिटर ताडी पोलिसांनी जप्त केली असून

सुनील रमेश जाधव वय ३२ रा.उंब्रज मुळगाव पाटण,मधुकर विठ्ठल जाधव वय ६५ रा.माजगाव ता.पाटण,सोन्या उर्फ महेश नथुराम कमाने रा.उंब्रज या तीन संशयितांवर उंब्रज पोलिसात गुन्हे दाखल झाले आहेत.

याबाबत उंब्रज पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार दि.गुरुवार दि.११ रोजी पाली ता.कराड गावाच्या हद्दीमध्ये एका घराच्या आडोश्याला संशयित आरोपी सुनिल रमेश यादव वय वर्ष ३२ रा.सध्या उंब्रज मुळ गाव जुने एसटी स्टँड पाटण ता. पाटण जि .सातारा हा विनापरवाना अवैध रित्या ताडी विकत असलेची माहिती लागताच सदर ठिकाणी छापा टाकून त्याच्यावर कारवाई करण्यात आलेली आहे,

तसेच उंब्रज गावचे हद्दीत यशवंत जाधव हायस्कूल पाठीमागे उत्तर मांड नदी जवळ घराच्या आडोशास संशयित आरोपी मधुकर विठ्ठल जाधव वय वर्षे ६५ रा. माजगाव ता. पाटण जि सातारा व सोन्या उर्फ महेश नथुराम कमाने रा .उंब्रज हे तीस लिटर पांढरे रंगाचे आंबट गुळचट उग्र वासाची प्लास्टिकचे पिशवी मधे उग्र वासाची ताडी विनापरवाना अवैध रित्या विकताना मिळून आले असून दोन्ही ठिकाणीं एकूण एक हजार रूपये किमतीची पन्नास लिटर ताडी मिळून आली असून संशयित आरोपीवर वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले असून पुढील तपास उंब्रज पोलीस करीत आहेत.

# भाजपचे जिल्हाध्यक्ष धैर्यशील कदम म्हणजे बेगानी शादी मे अब्दुल्ला दिवाना

## भाजप पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष प्रवीण धसके यांचा घरचा आहेर

**सातारा :** खासदार उदयनराजे भोसले यांचे बगलबच्चे नव्हे तर ते मावळे असतात हे विसरणारा कावळा छत्रपतींच्या स्वराज्याच्या विचार जपणारा असू शकतो? हा प्रश्न निर्माण होतो .उदयनराजे हे महायुतीचे उमेदवार होते व महायुतीमध्ये शिवसेना, राष्ट्रवादी, आरपीआय, शेतकरी संघटना, मनसे, रासप, यासारख्या पक्षाच्या नेत्यांनी व कार्यकर्त्यांनी जिवापाड प्रेमापोटी अतोनात कष्ट करून उदयनराजे भोसले यांना निवडून दिले त्यावेळी धैर्यशील कदम हे माढ्याच्या प्रचारात मश्गूल होते.

जिल्ह्यात स्वयंघोषित नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली आपल्या चांडाळ चौकडीने काय दिवे लावले याचा लेखाजोखा पक्षातील ज्येष्ठ नेत्यांनी वरिष्ठांकडे पोहोचवला आहेच त्यामुळे आपली अवस्था म्हणजे बेगानी शादी मे अब्दुल्ला दिवाना अशी झाली आहे अशी कडवट टीका भाजप पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष प्रवीण केशवराव धसके यांनी पत्रकाद्वारे केली आहे .

आमदार जयकुमार गोरे व सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेचे उपाध्यक्ष अनिल देसाई यांच्या रंगलेल्या राजकीय कलगीतुऱ्याच्या पार्श्वभूमीवर भाजप जिल्हाध्यक्ष धैर्यशील कदम पत्रकार परिषद घेऊन देसाई यांच्यावर टीका केली होती या टीकेदरम्यान छत्रपती उदयनराजे भोसले यांचा संदर्भ त्यांनी दिला होता या पार्श्वभूमीवर प्रवीण धस्के यांनी कदम यांचा समाचार घेतला

पत्रकात नमूद आहे की जिल्ह्यातील स्वयंघोषित नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली आपल्या चांडाळ चौकडी ने काय दिवे लावले याचा लेखाजोखा पक्षातील ज्येष्ठ नेत्यांनी वरिष्ठांकडे पोहोचवलेला आहे. निवडणुकीपूर्वी शिवराजसिंह चव्हाण, कामाप्रसाद तासा, रवींद्र चव्हाण, अजय मिश्रा, यासारख्या नेत्यांचे निरीक्षण दौरे होत असताना गाडीत बसून व खाजगीत आपण कानभरणी करता.

त्यामुळे आपला उद्योग देखील लपून राहिलेला नाही यादरम्यानच्या चर्चेत आपण उदयनराजेंना तिकीट मिळण्याबाबत किती प्रामाणिक होता हे देखील समजले या निमित्ताने लोकसभेच्या निवडणुकीसाठी आपण शिवलेल्या जाकिटांची चर्चा पुसेसावळी जिल्हा परिषद गटात खमंगपणे रंगलेली ऐकिवात आहे.

आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी उदयनराजे यांच्या मताधिक्यासाठी आटोकाट प्रयत्न केले याशिवाय आमदार महेश शिंदे डॉक्टर प्रियाताई शिंदे पालकमंत्री शंभूराजे देसाई कराड दक्षिण मध्ये आनंदराव नाना राजेंद्र यादव जितेंद्र डुबल यांनी त्यांच्या त्यांच्या कार्यक्षेत्रात निकराची लढाई लढली आमदार मकरंद पाटील मदनदादा भोसले सुरभीताई भोसले यांनी वाई मतदारसंघात आपल्या प्रयत्नांची पराकाष्ठा केली या सर्व मतदारसंघातून उदयनराजे यांना मतदारांनी कौल दिल्यामुळे ते निवडून आले आहेत

या निकराच्या लढाईमध्ये आपण सातारा लोकसभा मतदारसंघ सोडून माढा लोकसभेच्या उमेदवाराच्या प्रेमापोटी तेथेच मश्गूल होता हे संपूर्ण कराड उत्तरच्या जनतेला ज्ञात आहे याबाबतचा कोणताही पुरावा देण्याची गरज नाही महायुतीच्या सर्वच घटक पक्षांनी आणि त्यांच्या नेते मंडळींनी प्रामाणिकपणे काम केले मात्र या निकालाचे फुकटचे श्रेय घेण्यासाठी व सवयीप्रमाणे चमकोगिरी करण्यासाठी आपण चांडाळ चौकडी सोबत दिल्ली वारी केली साताऱ्यातील जनता हे केलेले पाप मुळासकट उपटून काढण्यात माहीर आहे

हे सुद्धा आपल्याला ज्ञात असावे. माढ्याच्या पराभवाने हाणतोय सख्या आणि कुथतोय तुक्या या उक्तीप्रमाणे वैफल्यग्रस्त होऊन आपल्या तोंडून पक्षश्रेष्ठीला न शोभणारी अशी वक्तव्य आपणाकडून होत आहेत याची वरिष्ठ पातळीवर नक्कीच दखल घेतली जाईल. ज्यांना आपण बगलबच्चे म्हणता ते महाराजांचे मावळे आहेत आपल्या कर्तबगारीचा इतिहास सर्वांना ज्ञात आहे महायुतीतील उदयनराजेंवर प्रेम करणाऱ्या सर्व पक्षातील मावळ्यांनी ही निवडणूक हाती घेतली होती . यापुढे आपणाकडून अशा गोष्टीची पुनरावृत्ती झाल्यास पक्षाच्या व्यासपीठावर त्याचे आपणास उत्तर दिले जाईल असा इशारा धस्के यांनी दिला आहे.

# माळी समाज राजकीय संकल्प परिषद



**मुंबई :** ज्या समाजाची जेवढी लोकसंख्या तेवढे राजकीय आरक्षण मिळत नसल्याने माळी समाजाने १३ जुलै रोजीमाळी समाज राजकीय संकल्प परिषदेचे आयोजन केले आहे. नवी मुंबईत ऐरोली येथे संत सावता भवन येथे सकाळी ११ वाजता राज्यभरातील माळी समाज एकत्र येणार आहे अशी माहिती मुख्य आयोजक राजेंद्र महाडोळे यांनी मुंबई मराठी पत्रकार संघ येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

देशात लोकसंख्येच्या २२ टक्के व राज्यात १९ टक्के माळी समाज असताना राजकीय सत्तेत वाटा फार कमी आहे. माळी समाज प्रमाणे व इतर सर्व समाजाला त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात राजकीय वाटा द्यावा. अशी मागणी परिषदेत करण्यात येणार आहे. यापूर्वी नागपूर येथे पाहिली संकल्प परिषद झाली व आता दुसरी नवी मुंबईत होत आहे.

यावेळी नितीन बनकर, किरणशेठ झोगडे, रोहिदास लोखंडे, सत्यवान भास्कर, अजिंक्य शिंदे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# करंजविहिरे येथे महिला सबलीकरणासाठी कौशल्याधारीत प्रशिक्षण

**राजगुरूनगर (वा.) :** करंजविहिरे (ता. खेड) येथे महिला सबलीकरण व्हावे यासाठी करंजविहिरे ग्रामपंचायत च्या वतीने पर्णकुटी प्रशिक्षण संस्थेमार्फत गावातील महिलांना नुकतेच कौशल्याधारित प्रशिक्षण देण्यात आले.

सरपंच निकिता गावडे यांच्या संकल्पनेतून महिलांसाठी आरी वर्क प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी उपसरपंच सौ सविता शिवेकर सदस्य सुनिता वाळके, अर्चना बोऱ्हाडे, अनिता कोळेकर, सारिका भोसले व ग्रामसेवक जे. एस. तांबे उपस्थित होते.

गावातील ६० महिलांनी या व्यावसायिक प्रशिक्षण शिबिराचा लाभ घेतला. सरपंच सौ निकिता गावडे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, महिलांचे जीवन सुखकर करण्यावर माझा भर असेल या प्रशिक्षणाचा सदुपयोग महिला अर्थाजनासाठी करतील महिलांना यातून रोजगाराच्या संधी उत्पन्न होतील व महिला आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी होतील.

पर्णकुटी संस्थेच्या अध्यक्ष प्रणिता भालेकर तसेच त्यांच्या प्रशिक्षण देणाऱ्या सुप्रिया खांडगे यांनी महिलांना प्रशिक्षण दिले त्याच वेळी मान्यवरांचे व महिलांचे मनोगत, महिलांना प्रमाणपत्र वाटप तसेच मान्यवरांचा सत्कार समारंभ करण्यात आला. यावेळी गावातील महिला ग्रामस्थ उपस्थित होत्या.

# केळवली धबधब्यातील युवकाचा मृतदेह सापडला

## शिवेंद्रसिंहराजे रेस्क्यूटीमच्या प्रयत्नांना यश : अकरा दिवस सुरु होती शोधमोहिम

**सातारा :** केळवली (ता. सातारा) येथील धबधब्यात बुडालेल्या सैदापुर येथील ऋषिकेश कांबळे यांचा मृतदेह शिवेंद्रसिंहराजे रेस्क्यू टीमच्या सहाय्याने तब्बल अकरा दिवसांच्या शोधमोहिमे नंतर आज (गुरुवार) धबधब्यापासून चार किलोमिटर अंतरावर खोल दरीत हा मृतदेह शोधण्यात यश आले.



सविस्तर वृत्त असे की, कऱ्हाड तालुक्यातील सैदापुर येथील ऋषिकेश कांबळे (वय-२२) हा युवक त्याच्या दोन मित्रांसोबत ३० जून रोजी केळवली धबधबा बघण्यासाठी आला होता. यावेळी ऋषिकेश पाण्यात उतरला पोहताना धबधब्याच्या पाण्याच्या मुख्य प्रवाहात आल्याने तो बुडाला असल्याचे त्याच्या मित्रांकडून सांगण्यात आले. यानंतर प्राथमिक ग्रामस्थांनी शोध घेतला त्यानंतर पोलिसांशी संपर्क साधला. मात्र, परळी खोऱ्यात असलेली पावसाची संततधार आणि केळवली धबधब्याने घेतलेल्या रौद्ररुपामुळे शोधमोहिमेत मोठ्या अडचणी येत होत्या. शिवेंद्रसिंहराजे रेस्क्यू टीमने या परिस्थितीवर मात करत संपुर्ण धबधबा परिसरात शोध घेतला. बुधवारी सायंकाळी चार वाजता धबधब्यापासून चार किमी अंतरावर खोल दरीत मृतदेह असल्याचा अंदाज आला होता. रात्रीची शोधमोहिम शक्य नसल्याने शिवेंद्रसिंहराजे रेस्क्यू टीमने गुरुवारी सकाळी आठ वाजलेपासून शोधकार्य सुरु केले. मात्र, पाण्याच्या प्रवाहाबरोबर मृतदेह वाहून येताना मोठ मोठे दगड वाहून येत मृतदेहावर पडले होते त्यामुळे रेस्क्यू करण्यात अडवणी येत होत्या. तब्बल ८ तासांच्या शोधकार्यानंतर दरीमधून मृतदेह काढण्यात यश आले.

### शिवेंद्रसिंहराजे रेस्क्यू टीमची प्रयत्नांची पराकाष्ठा

**छत्रपती शिवेंद्रसिंह रेस्क्यू टीमने आपल्या प्रयत्नांची पराकाष्ठा करत केळवली धबधब्यापासून ते अगदी उरमोडी धरण पात्रात बोटिंग करत बुडालेल्या युवकासाठी शोध मोहीम घेतली. मुसळधार पाऊस, वादळ, वारा जाण्यासाठी करावी लागणारी पायपिट कोणत्याही सोयी सुविधा नाहीत अशामध्ये तब्बल अकरा दिवस रेस्क्यू सुरु ठेवले. शिवेंद्रसिंह रेस्क्यू टीम मध्ये गेल्या दहा दिवसापासून चंद्रसेन पवार, गणेश निपाने, सिद्धार्थ गायकवाड, आदित्य पवार, देवा गुरव, विशाल वांगडे या सदस्यांनी प्रयत्न केले आजच्या शोध कार्यात हीहे सर्व सदस्य उपस्थित होते.**

# इन्स्पायर अकॅडमीचा गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा संपन्न

**वर्धनगड :** इन्स्पायर कॅडमी सातारा येथे गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा साजरा करण्यात आला यामध्ये मा. नामदार महेशजी शिंदे यांचा सत्कार संस्थेचे संचालक श्री कमलकांत सर यांनी केले त्यानंतर ना. श्री महेशजी शिंदे यांचे हस्ते

आय.आय.टी. प्रवेश यादीमध्ये निवड झालेल्या ६ विद्यार्थाचा सत्कार करण्यात आला. रूद्रनील जाधव सी.आर. एल. २३५१, हर्ष गुगले सी.आर.एल. ४७४८, श्रीधर जाधव सी.आर.एल. १७८५१, अदित्य सावंत सी.आर.एल. जी.इ. एन. ई.डब्ल्यू.एस. ४३२२, श्रेयस



निकम सी.आर.एल.जी.इ.एन. इ.डब्ल्यू. एस. ४८ नीट, मधील गुणवंत विद्यार्थी अर्चना सुर्यवंशी ५९४ गुण, मृणाल तावरे ५७६, गुण कार्यक्रमात ना. महेश शिंदे यांनी विद्यार्थांना मार्गदर्शन केले. त्यामध्ये संस्कार व देश व समाजासाठी काम करण्याचा मैलिक शिकवण देऊन या पुढील काळातही या विद्यालयाचे गुणवत्ता यादीमध्ये विद्यार्थी यावेत अशी शुभेच्छा व्यक्त केली. श्री शिंदे यांनी ना. महेश शिंदे व सर्व पालक विद्यार्थी यांचे आभार मानले. सौ. शिंदे मॅडम यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचलन केले.

# पिस्टल विक्रीकरीता आलेल्या दोघांना अटक

**कराड :** १० दीड वर्षात ९० पिस्टल जप्त सातारा जिल्हा पोलीस दलाकडून नोव्हेंबर २०२२ पासून आजपर्यंत ९० देशी बनावटीची पिस्टल, तीन बारा बोअर बंदुक, एक रायफल, १९९ जिवंत काडतुस, ३८५ रिकाम्या पुंगळ्या, एक रिकामे मॅगझीन असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. विद्यानगर ता. कराड येथे अवैधरित्या पिस्टलची विक्री करण्यासाठी आलेल्या दोघांना कराड शहर गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पथकाने ताब्यात घेतले.

# विशालगडावरील मशीद बांधकामाविरोधात आंदोलन

**मुंबई :** छत्रपती शिवाजी महाराजांनी बांधलेले किल्ले व दुर्ग यांची अवस्था वाईट असताना कोल्हापूर जिल्ह्यातील विशालगडावरील अनधिकृत पद्धतीने बांधकाम होत आहे. या विरोधात शिवप्रेमींनी आझाद मैदानावर धरणे आंदोलन केले. यावेळी मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री आणि राज्याचे कॅबिनेट मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी आंदोलन स्थळी भेट देत या प्रकरणी सरकार गंभीर दखल घेईल असे आश्वासन दिले.

विशालगडावर होत असलेल्या या अनधिकृत मशीद बांधकामा विरोधात शिवप्रेमी व काही सामान्य नागरिकांनी विविध मार्गांनी आपला विरोध दर्शवत राज्यभर निदर्शने केली व याच पार्श्वभूमीवर आझाद मैदानावरही आंदोलन केले. विशाळगडाचे पावित्र्य जापण्यासाठी आंदोलन करणाऱ्या सर्व आंदोलनकर्त्यांचा आवाज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कानावर ताबडतोब घालून योग्य ती कार्यवाही करण्यासाठी मी स्वतः पुढाकार घेतो असे आश्वासन दिले.



# संभाजी ब्रिगेडच्यावतीने साताऱ्यात खड्ड्यांचा वाढदिवस साजरा

## अनोख्या आंदोलनाची साताऱ्यात चर्चा

**सातारा :** सातारा शहरांमध्ये गेल्या पंधरा दिवसात झालेल्या जोरदार पावसामुळे रस्त्यांची वाट लागली आहे. मोनार्क हॉटेल ते वाय सी कॉलेज यादरम्यान पडलेल्या प्रचंड खड्ड्यामुळे वाहन चालकांना प्रचंड त्रास होत आहे या घटनेच्या निषेधार्थ संभाजी ब्रिगेड सातारा शहर च्या वतीने भर रस्त्यावर केक कापून खड्ड्यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला या अभिनव आंदोलनाची साताऱ्यात जोरदार चर्चा होती

संभाजी ब्रिगेड, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, शहर सुधार समिती यांच्यावतीने सातारा पालिकेचे मुख्याधिकारी अभिजीत बापट यांना सातारा शहरात पडलेल्या खड्ड्यांची तात्पुरती दुरुस्ती करण्यात यावी याबाबत सातत्याने निवेदने दिली जात आहेत .मात्र सातारा पालिकेच्या बांधकाम विभागाकडून सकारात्मक प्रतिसाद दिला जात नसल्याचे चित्र आहे .संभाजी ब्रिगेडच्या वतीने मुख्याधिकाऱ्यांना दोन दिवसापूर्वी याबाबत लेखी पत्र देण्यात आले होते मात्र कोणतीही कारवाई कार्यवाही न



झाल्याने संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांनी गुरुवारी सकाळी होणार हॉटेलच्या परिसरात पंचायत समितीच्या पिछाडीला असलेल्या चौकामध्ये रस्त्यावर केक कापून खड्ड्यांचा वाढदिवस साजरा केला.

या अनोख्या आंदोलनाची साताऱ्यामध्ये जोरदार चर्चा झाली येथे बरेचसे खड्ड्यांमध्ये पाणी भरले असून वाहन चालकांचे वाहनांमुळे मणके ढिले होऊ लागले आहेत संभाजी ब्रिगेडच्या सदस्यांनी याबाबत तातडीने कार्यवाही न झाल्यास याहीपेक्षा वेगळा आंदोलन करण्याचा पुन्हा इशारा दिला आहे.

# बारामतीच्या जनसन्मान मेळाव्यासाठी कोल्हापुरातून पाच हजार कार्यकर्ते जाणार

## आ. राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब पाटील- आसुर्लेकर यांची माहिती





**कोल्हापूर :** उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली बारामती येथे रविवारी दि १४ राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा जनसन्मान मेळावा होत आहे. या मेळाव्यासाठी वैद्यकीय शिक्षण व विशेष सहाय्य मंत्री तथा; कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार हसनसाहेब मुश्रीफ यांच्या नेतृत्वाखाली कोल्हापूर जिल्ह्यातील पाच हजारावर कार्यकर्ते स्वखर्चाने जाणार असल्याची माहिती, पक्षाचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब पाटील-आसुर्लेकर यांनी दिली.

या मेळाव्याला जाण्याच्या नियोजनासाठी कोल्हापुरात आयोजित कोल्हापूर शहर व जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत पाटील-आसुर्लेकर बोलत होते. या मेळाव्याला कोल्हापुरातून मोठ्या संख्येने जाऊन मेळावा यशस्वी करूया, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

महाराष्ट्रात महायुती सरकारने अनेक लोककल्याणकारी योजना राबविल्या आहेत. मुख्यमंत्री -माझी लाडकी बहीण योजनेसह लेक माझी लाडकी, कृषीपंपांना मोफत वीज, मुलींच्या उच्च शिक्षणासाठी फी माफीसह अनेक योजना सुरू केल्या असल्याचे केडीसीसी बँकेचे संचालक प्रताप उर्फ भैया माने यांनी सांगितले.

गोकुळ दूध संघाचे संचालक प्रा. किसनराव चौगुले यांनी मांडलेल्या महायुती सरकारच्या अभिनंदनाच्या ठरावाला उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात दाद दिली.

गोकुळ दूध संघाचे संचालक प्रा. किसनराव चौगुले, केडीसीसी बँकेचे संचालक प्रताप उर्फ भैया माने, महिला जिल्हाध्यक्ष सौ. शितल फराकटे, शहराध्यक्ष आदिल फरास यांची मनोगते झाली.

यावेळी राष्ट्रवादीचे जिल्हा उपाध्यक्ष मधुकर जांभळे, युवक जिल्हाध्यक्ष नितीन दिंडे, केडीसीसी बँकेचे संचालक सुधीर देसाई, रणवीरसिंह गायकवाड, रणजितसिंह पाटील, कोल्हापूर शहराध्यक्ष श्रीमती रेखा आवळे, इचलकरंजी कार्याध्यक्ष अमित गाताडे, हातकणंगले तालुकाध्यक्ष शिरीष देसाई, प्रदेश युवक सरचिटणीस अभिषेक डोंगळे, हातकणंगले तालुका अध्यक्ष संभाजीराव पवार, ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष भिकाजी एकल, बाजार समितीचे माजी संचालक नानासाहेब पाटील यांच्यासह पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विशाळगड अतिक्रमण मुक्त करण्यास मुख्यमंत्री सक्षम : राजेश क्षीरसागर

## विशाळगड अतिक्रमण मुक्ती संदर्भात शिवसेना पदाधिकाऱ्यांची बैठक



**कोल्हापूर :** गडांवरील अतिक्रमणे दूर करणे यासाठी शासन कटिबद्ध असून, यापूर्वी कोणत्याच सरकारला न जमलेले काम म्हणजे प्रतापगडाखालील अफजल खानाच्या कबर परिसरात झालेले अतिक्रमण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशाने महायुती सरकारने एका दिवसात जमीनदोस्त केले. त्यामुळे विशाळगडावर झालेले अतिक्रमण काढण्यास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सक्षम असल्याचा विश्वास राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष राजेश क्षीरसागर यांनी व्यक्त केला.

विशाळगड अतिक्रमण प्रश्नी शिवसेना प्रमुख पदाधिकाऱ्यांची आज शिवालय शिवसेना जिल्हा मध्यवर्ती कार्यालय, शनिवार पेठ येथे बैठक पार पडली. याप्रसंगी ते बोलत होते.

क्षीरसागर म्हणाले, विशाळगडावरील अतिक्रमण काढण्याबाबत उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल असणाऱ्या खटल्यांमध्ये दि.१६ फेब्रुवारी २०२३ रोजी.उच्च न्यायालयाने अतिक्रमण निर्मूलनाची कार्यवाहीस स्थगिती दिली आहे. सदर खटल्याबाबत सुनावणी सुरु असून, दि.११ जुलै २०२४ रोजी सदर खटल्याची तारीख होती व सदरचा खटला ६१ व्या क्रमांकावर होता. न्यायालयाने दि.१९ ऑगस्ट २०२४ रोजी अंतरिम स्थगिती कायम ठेवत सुनावणीची पुढील तारीख दिली आहे. दरम्यान अफजल खान्याच्या कबरी शेजारी झालेले अतिक्रमण काढण्याचा निर्णय सुमारे २२ वर्षांपूर्वी .न्यायालयाने दिला होता. पण सदर अतिक्रमण काढण्याचे धाडस कोणत्याही सरकारने दाखविले नाही. पण, मुख्यमंत्री .एकनाथ शिंदे यांनी एका दिवसात हे अतिक्रमण उध्वस्थ केले. विशाळगडावरील अतिक्रमणाचा प्रश्न न्यायप्रविष्ठ बाब आहे. त्यामुळे यामध्ये कोणीही राजकारण करण्याच्या प्रयत्न करू नये

यावेळी जिल्हाप्रमुख सुजित चव्हाण, महानगरप्रमुख शिवाजी जाधव, शहरप्रमुख रणजीत जाधव, उपजिल्हाप्रमुख उदय भोसले, तुकाराम साळोखे, किशोर घाटगे, दीपक चव्हाण, सुनील खोत, राज जाधव, राहुल चव्हाण, रविंद्र पाटील, अजिंक्य पाटील आदी शिवसेना पदाधिकारी उपस्थित होते.

# करनूर खून प्रकरणातील चौघांना अटक; कोयता हल्ला केल्याची कबुली

**कोल्हापूर** - कागल तालुक्यातील करनूर इथं कोयत्याने हल्ला करून गुलाब शेख यांचा खून करण्यात आला होता . याप्रकरणी कोल्हापूर स्थानिक गुन्हे अधिवेशन शाखेन, चौघांना आज अटक केली आहे .मोटरसायकल घासल्याच्या कारणातून झालेल्या वादातून कोयता हल्ला केल्याची कबुली अटक केलेल्या चौघांनी दिली आहे .या चौघांचे आणखी दोन साथीदार पसार झाले असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत .

हातकणंगले तालुक्यातील कबनूर इथला प्रणोत शिवाजी धनवडे ,चंदुर इथला आकाश नरेश कांबळे , सौरभ दिनकर जाधव , सम्मेद विजय ऐनापुरे ,आदित्य प्रकाश कांबळे आणि हलकर्णी इथला सुशांत जरळी हे सहाजण घोडागाडी शर्यतीसाठी घोडा विकत घेण्यासाठी मतिवडे या गावी ८ जुलै रोजी गेले होते . सायंकाळी ते घरी परत येत असताना कागल तालुक्यातील करनूर इथल्या शेख मळ्याकड जाणाऱ्या रस्त्यावर करनूर इथ राहणारे गुलाब बाबालाल शेख यांच्या मोटरसायकलला या तरुणांची मोटरसायकल घासली . यातून त्यांच्यात जोरदार वादावादी झाली . त्यावेळी या सहाजणांनी गुलाब शेख यांच्यावर कोयत्यान हल्ला चढवला होता . त्यात गंभीर जखमी झाल्यान उपचारासाठी त्यांना कोल्हापुरातील सीपीआर रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं . मात्र उपचारादरम्यान गुलाब शेख यांचा गुरुवारी पहाटे मृत्यू झाला होता . या प्रकरणी कोल्हापूर स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेन आज प्रणोत धनवडे , आकाश कांबळे ' सौरभ जाधव आणि सम्मेद ऐनापुरे या चौघांना इचलकरंजी परिसरातून अटक केलीय .पुढील तपासासाठी त्यांना कागल पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला आहे. दरम्यान चंदुर इथला साथीदार आदित्य प्रकाश कांबळे आणि हलकर्णी इथला साथीदार सुशांत जरळी हे दोघे पसार झाले असून, पोलीस त्यांचा शोध घेत आहेत .

# म्हाडाच्या जीर्ण झालेल्या इमारतीच्या छताचा भाग कोसळल्याने रहिवाशी संतप्त

**मुंबई :** पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर धोकादायक इमारतींबाबत सरकारकडून खबरदारी घेण्यात येत असतानाच काही ठिकाणी इमारतींमधे छताचा भाग कोसळणे तर काही ठिकाणी ईमारत खाचने, पडणे अशा घटना घडत आहेत. मानखुर्द येथील पी एम जी पी कॉलनीत जीर्ण झालेल्या इमारतीचा छताचा भाग कोसळल्याने भयभीत झालेले रहिवाशी संतप्त झाले आहेत.

ईमारत क्रमांक २० मधील पहिल्या मजल्यावरील छताचा भाग कोसळला. पहाटे घटना घडल्याने सुदैवाने जीवित हानी झाली नाही. यापूर्वीही अशा छोट्या घटना घडल्या असल्याने तात्पुरती मलमपट्टी करून प्लास्टर करण्यात येत होते. अशी तात्पुरती मलमपट्टी अजून किती दिवस करत राहायची ? असा सवाल येथील रहिवाशी करत आहेत. आमचा जीव गेल्यावर सरकार लक्ष देणार आहे का ? निवडणुका आल्या की लोकप्रतिनिधी मतांचा जोगवा मागण्यासाठी येतात व आश्वासन देऊन जातात.छताचा भाग पाडून आमचा जीव जाणार आहे. लोकप्रतिनिधींचा नाही. अशी संतप्त प्रतिक्रिया रहिवाशी देत आहेत.

पिण्याच्या पाण्याची सोय नाही, गटारे नाले योग्य प्रकारे साफसफाई होत नसल्याने आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. त्यात छताचा भाग कोसळण्याची टांगती तलवार कायम आहे. पुनर्विकास होण्यासाठी येथील ज्ररर्सी रहिवाशी प्रयत्न करत आहेत मात्र काही रहिवाशी त्यांना सहकार्य करत नसल्याने नवीन टॉवर मध्ये राहण्याचे स्वप्न पाहून एक पिढी वयोवृध्द झाली आहे.

# कागलमध्ये मंत्री हसन मुश्रीफ यांचा शेतकऱ्यांकडून सत्कार

## कृषीपंप वीजबील माफीसह शेतकऱ्यांच्या मागण्यांचा केला पाठपुरावा



**कोल्हापूर :** राज्य शासनाने साडेसात अश्वशक्तीपर्यंतच्या मोटर पंपांचे वीजबील माफ केल्याबद्दल आणि शेतकऱ्यांच्या मागण्यांचा पाठपुरावा केल्याबद्दल शेतकऱ्यांच्यावतीने पालकमंत्री हसन मुश्रीफ यांचा कागलमध्ये शेतकऱ्यांच्यावतीने सत्कार झाला. कागल शहरातील श्री. शिवाजी विकास सेवा संस्था, छत्रपती संभाजी विकास सेवा संस्था, श्री. गहिनीनाथ विकास सेवा संस्था, छत्रपती शाहू सहकारी पाणीपुरवठा संस्था या संस्थांच्या सभासद शेतकऱ्यांच्यावतीने या सत्काराचे आयोजन केले होते.

केंद्र सरकारच्या पी. एम. किसान योजनेप्रमाणेच राज्य सरकारने किसान सन्मान योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना दरमहा दोन हजार रुपये सुरू केल्याबद्दल, शेतीसाठी एक रुपयात पिक विमा, अशा अनेक शेतकरी कल्याणाच्या योजना सुरू केल्याबद्दल शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

यावेळी केडीसीसी बँकेचे संचालक प्रताप उर्फ भैया माने, श्री. शिवाजी सेवा संस्थेचे माजी अध्यक्ष तात्यासाहेब पाटील, विद्यमान अध्यक्ष राजेंद्र गोणुगुडे, छत्रपती संभाजी सेवा संस्थेचे अध्यक्ष शहानुर पखाली, छत्रपती शाहू सहकारी पाणीपुरवठा संस्थेचे अध्यक्ष शिवाजीराव भगले, रामा गोरडे, गणपती संतमाळी, बाळगोंड मगदूम, गहिनीनाथ समूहाचे अध्यक्ष सम्राट सनगर यांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# पर्यावरण पूरक अशी सातारा-पंढरपूर सायकलवारी सातारा सायकलिंग क्लबचा अनोखा उपक्रम

## सातारा सायकलिंग क्लबच्या वतीने १३ जुलै रोजी सातारा ते पंढरपूर सायकलवारीचे आयोजन

शारीरिक तंदुरुस्ती व पर्यावरण समृध्दी हा संदेश देण्यासाठी या वेगळ्या रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे . सकाळी सहा वाजता येथील जिल्हा परिषदेच्या मैदानावरून सायंकाळी सहा वाजता या रॅलीला सुरवात होणार आहे . हा साताऱ्यातील सायकलिंग वरती प्रेम असलेल्या सर्व सायकलीस्टनी मिळून सुरू केलेला क्लब आहे. ह्या क्लब मध्ये सातारा जिल्हा व महाराष्ट्रातील काही इतर जिल्ह्यातील मिळून ४५० पेक्षा जास्त क्लब मेंबरचा सहभाग आहे. सातारा सायकलींग क्लब वेळोवेळी सायकलिंगच्या विविध स्पर्धांमध्ये सहभाग घेत असतो व सातारा जिल्ह्यातील किशोरवयीन व तरुण सायकलीस्टना विविध स्पर्धांमध्ये सहभागी होण्यास प्रोत्साहन देत असतो व मार्गदर्शन करीत असतो. सातारा सायकलिंग क्लब गेली पाच वर्ष सातत्याने आषाढी एकादशीपूर्वी सातारा-पंढरपूर या एक दिवसीय सायकलवारीचे आयोजन करीत असतो. याही वर्षी सातारा सायकलींग क्लबने दिनांक १३ जुलै २०२४ शनिवारी या पर्यावरण पूरक अशा सातारा-पंढरपूर सायकलवारीचे आयोजन केले आहे,

सकाळी ६ वाजता सायकलवारीची सुरुवात होईल. सायकल वारी मार्ग : सातारा - कोरेगाव - पुसेगाव - गोंदवले - म्हसवड- वाखरी पंढरपूर या मार्गे सायकल वारकरी जाणार असून सायंकाळी ५ वाजता पंढरपूर येथे पोहोचतील व येताना वाहनाने परतीचा प्रवास करतील यावर्षी या सायकलवारीसाठी उच्चांकी संख्येने म्हणजेच १५० हून अधिक सायकलिस्ट यामध्ये सहभाग नोंदवलेला आहे. यामध्ये आठ वर्षाच्या सर्वात लहान सायकलस्वारापासून पासून ते ७३ वर्षाच्या ज्येष्ठ महीला व पुरुष नागरिकांचा सहभाग आहे. सायकलवारीसाठी येणाऱ्या सायकलस्वारांना यामध्ये सकाळचा नाष्टा, अल्पोपहार, हायड्रेशन, मेडिकल सपोर्ट, टेक्निकल सपोर्ट, दुपारचे जेवण, संध्याकाळची न्याहारी व रात्रीच्या जेवणाची व्यवस्था केली आहे, सातारा सायकलिंग क्लब तर्फे सर्व सातारकरांना आवाहन करण्यात येते की त्यांनी १३ जुलै- शनिवारी सकाळी ठीक ६ वाजता जिल्हा परिषद ग्राऊंडवर येथे उपस्थित राहून सर्व सायकलस्वारांना प्रोत्साहनपर शुभेच्छा द्याव्यात.

# वेगवेगळ्या ठिकाणी गावठी दारू विकणाऱ्या दोन महिलांवर कारवाई

**नारायणगाव :** नारायणगाव पोलिसांनी धनगरवाडी शिवारात बेकायदेशीर गावठी हातभट्टी दारू विक्री करणाऱ्या दोन महिलांवर धडक कारवाई केली.दोन्ही कारवाईत एकूण तेराहजार पाचशे रुपये किंमतीची गावठी हातभट्टी दारू जागीच नष्ट केली. असल्याची माहिती नारायणगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक महादेव शेलार यांनी दिली.

धनगरवाडी गावचे हद्दीत चिंचेच्या झाडाखाली बेकादेशीर एक महिला गावठी हातभट्टीची दारू जवळ बाळगून तिच्या ओळखीच्या लोकांना चोरून विक्री करीत असताना आढळली. याबाबतची फिर्याद सुवर्णा श्रीकांत गडगे या महिला पोलिस कॉनस्टेबल यांनी नारायणगाव पोलीस स्टेशनला दिली.

या ठिकाणी एकूण १० हजार ५००/-रुपये किमतीची गावठी दारू पोलिसांना मिळून आली. तर दुसरी कारवाई धनगरवाडी शिवारातील साईबाबा मंदिराच्या आडोशाला एक महिला गावठी दारू विक्री करीत असताना आढळून आली होती.येथेही तीन हजार रुपये किंमतीची गावठी दारू पोलिसांना मिळून आली.दोन्ही कारवाईत एकूण १३ हजार ५००/-रुपये किंमतीची गावठी हातभट्टीची दारू पोलिसांनी जागीच नष्ट केली. नारायणगाव पोलीस स्टेशनचे पोलीस शिपाई गोरक्ष अशोक हासे यांनी या महिले विरुद्ध फिर्याद दिली होती. बेकायदेशीर रित्या गावठी दारू विकणाऱ्या दोन्ही महिलांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ ६५ (श) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# सामाजिक न्याय विभाग व बार्टीच्या शिष्यवृत्ती मधील जाचक अटी दूर करा : माजी उपमहापौर डॉ.सिद्धार्थ धेंडे

## सामाजिक न्याय विभाग केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांना निवेदन



**हडपसर /पुणे :** उच्च शिक्षणासाठी दिली जाणाऱ्या शिष्यवृत्ती योजनेच्या संख्येत वाढ करावी. सामाजिक न्याय विभाग, बार्टीच्या शिष्यवृत्ती मधील जाचक अटी, त्रुटी, अडथळे दूर करा, मागासवर्गीय शिक्षण घेणा-या सर्व मुलांमुलींना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळायला पाहिजे अशी मागणी माजी उपमहापौर डॉ. सिद्धार्थ धेंडे रिपाइं (आठवले गट) पुणे शहर पदाधिकारी यांच्या शिष्टमंडळाने केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले साहेब यांचायाकडे केली.रामदास आठवले पुणे दौऱ्यावर आले असता कार्यकर्त्यांनी व डॉ धेंडे यांनी त्यांची भेट घेऊन वरील मागणी केली.

सामाजिक न्याय विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था ( बार्टी) यांच्या वतीने विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या सुविधांमध्ये काही त्रुटी आणि अडथळे कसे येतात ते निदर्शनास आणून दिले.

याप्रसंगी महाराष्ट्र प्रदेश सचिव बाळासाहेब जानराव, प्रदेश संघटक परशुराम वाडेकर,पुणे शहर अध्यक्ष संजय सोनवणे, माजी शहर अध्यक्ष अशोक कांबळे, हेल्पिंग हँड्सचे अध्यक्ष कुलदीप आंबेकर सह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

डॉ. धेंडे यांच्यासह रिपाइं शिष्टमंडळांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, समान धोरणाच्या नावाखाली करण्यात आलेल्या जाचक अटी रद्द कराव्यात, उदा. केंद्र शासनाच्या एनओएस नियमावलीचा वापर करण्यात यावा, खाजगी विद्यापीठात एससी विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्तीची तरतुद करण्यात देण्यात यावी, शिष्यवृत्तीच्या रक्कमेत वाढ करण्यात यावी, त्यातील स्वाधार सारख्या योजनामधील जाचक अटी रद्द करण्यात याव्यात,समान संधी केंद्र योजना महाविद्यालय स्तरावर सुरु करण्याचे बंधनकारक करावे, सर्व विद्यार्थ्यांच्या हिताच्या योजनेसाठी प तयार करण्यात यावे,कौशल्य विकास योजनामध्ये नवीन योजनाना संधी द्यावी,उदा. फार्मसी, आयटी, डेटा सायन्स क्षेत्रातील तरुणांना संधी मिळेल, जात पडताळणी विभाग पासपोर्टवरच्या धर्तीवर करण्यात यावी, बार्टी संस्थेमार्फत बँचमार्क सर्वेक्षण करण्यात यावे,संशोधन करणाऱ्या पीएचडी विद्यार्थी संख्येमध्ये वाढ करण्यात यावे, बार्टी संस्थेत होणाऱ्या स्पर्धा परीक्षा व्यतिरिक्त इतर ही कोर्सवर निधी खर्ची करण्यात यावा,

बार्टीतील बजेट मध्ये वाढ करावी. तसेच आता पर्यंत या योजनांचे सामाजिक लेखापरीक्षण करण्यात यावे, विद्यार्थ्यांच्या योजनेसाठी कॉलेज स्तरावर सामाजिक न्याय विभागचे जनजागृती अभियान राबवण्यात यावे, राज्यभर गाव व वस्ती स्तरावर मोफत लायब्ररी योजना सुरु करण्यात यावी, विद्यार्थ्यांसाठी विशेष बाब म्हणून दिले जाणारे प्रवेश चालु ठेवण्यात यावेत. उच्चशिक्षण घेणाऱ्या एससी विद्यार्थ्यांचा डेटा संकलित करण्यात यावा, अशा विविध मागण्या सामाजिक न्याय विभाग केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले साहेब यांच्याकडे केली.

वरील मागण्यांबाबत त्वरित सकारात्मक कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन केंद्रीय राज्यमंत्री आठवले यांनी दिले. तसेच अधिकाऱ्यांना त्याबाबत योग्य सूचना देण्यात आल्याची माहिती डॉ. धेंडे यांनी दिली.

# शिवसेनेच्या लाडकी बहीण शिबिरास महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**कोल्हापूर :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांनी राज्यातील महिला भगिनींसाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना लागू केली आहे. या योजनेची काटेकोरपणे अंमलबजावणी होवून कोल्हापूर शहरातील जास्तीत जास्त महिलांना याचा लाभ मिळावा याकरिता शहरात ५० ठिकाणी ऑनलाईन अर्ज शिबिरांचे आयोजन करण्यात आले असून, याचा शहरातील लाभार्थी महिलांनी लाभ घ्यावा, असे आवाहन राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष राजेश क्षीरसागर यांनी केले. शिवसेनेच्या वतीने लाडकी बहीण योजनेसह मतदार नोंदणी शिबिराचे उद्घाटन आज राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष श्री.राजेश क्षीरसागर यांच्या हस्ते खोलखंडोबा हॉल, शनिवार पेठ, कोल्हापूर येथे करण्यात आले. आजच्या या पहिल्याच शिबिरास शनिवार पेठ परिसरातील महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख सुजित चव्हाण, युवासेना पश्चिम महाराष्ट्र सचिव ऋतुराज क्षीरसागर, महानगरप्रमुख शिवाजी जाधव, शहरप्रमुख रणजीत जाधव, उपजिल्हाप्रमुख उदय भोसले, रमेश खाडे, किशोर घाटगे, तुकाराम साळोखे, दीपक चव्हाण, अनुसूचित जाती जमाती सेना जिल्हाप्रमुख निलेश हंकारे, रियाज बागवान, उपशहरप्रमुख सम्राट यादव, कपिल नाळे, विभागप्रमुख उदय पोतदार, नितीन मुधाले, आकाश झेंडे, विकास हंकारे, मुख्यमंत्री संपर्क कक्षाचे हिंदुराव पाटील, सुनील करंबे, गणेश पोवार यांच्यासह शिवसेना पदाधिकारी आदी उपस्थित होते.